**रे. दि. मु. क्रमांक ९८/२०१५ मधील नि.क्र. ५७ खालील आदेश.**
**रमेश तांबे व इतर -विरुध्द- अनंत तांबे व इतर**
**आदेश पारित दिनांक १३.०१.२०२३**

---

वादीतर्फे प्रस्तूतचा अर्ज मयत वादी क्र. ३ हिंमत पांडूरंग तांबे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला उशीर माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत वादी क्र. ४ विकास हिंमत तांबे याचे निशणी क्र. ५८ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादीचे असे कथन आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील वादी क्र. ३ हिंमत पांडूरंग तांबे हे दिनांक २९.०३.२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत वादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादी क्र. ३ हे मयत झाले त्यावेळी देशामध्ये कोरोना व्हायरस या महामारीचे प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करणेत आलेने वादी क्र. ३ चे वारसांना वकिलांची भेट घेवून तातडीने वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज देता आला नाही. त्यामुळे सदर मयत वादी क्र. ३ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला. त्यामुळे वादीने मयत वादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला उशीर माफ होवून मिळावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादीतर्फे असे म्हणणे दाखल की, अर्जातील कारण योग्य व बरोबर नाही. वादीवर जास्तीत जास्त कॉस्ट बसवणेत यावी व अर्ज रद्द व्हावा.

०४. वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. ३ हिंमत पांडूरंग तांबे हे दिनांक २९.०३.२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत वादी क्र. ३ यांचे वारस मुदतीत दाखल करणेस १० महिने २६ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरील दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकरिता वादी क्र. ३ यांचे

वारस अभिलेखावर असणे आवश्यक आहे. वादीने मयत वादी क्र. ३ यांच्या वारसांची नावे विहित वेळेत अभिलेखावर घेतले नसल्याचे हे कारण नमूद केले आहे की, वादी क्र. ३ हे मयत झाले त्यावेळी देशामध्ये कोरोना व्हायरस या महामारीचे प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करणेत आलेने वादी क्र. ३ चे वारसांना वकिलांची भेट घेवून तातडीने वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज देता आला नाही.

०५. सदरकामी, मयत वादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर देणेकरिता मदत होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचा अंतिम निकाल होणेकरिता मयत वादी क्र. ३ यांच्या वारसांची नावे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. परंतू, वादीने प्रस्तूत मयत वादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता उशीर झाल्यामुळे प्रकरण लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे वादीस सदर विलंबाकरिता कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. तरी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ५७ चा अर्ज रक्कम रुपये २००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टच्या आकारणीवर मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी. |
| २. | मयत वादी क्र. ३ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

दिनांकः- १३.०१.२०२३